प्रति,
मा. प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक
मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण
सर्व संचालक, (उच्चशिक्षण/तंत्रशिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण/कला/ग्रंथ
सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू.
निवड नस्ती समन्वय)

---

विद्यार्थी कल्याण मंडळ,
पुणे विद्यापीठ, पुणे – ७.
संदर्भ क्र.विकमं/२०१०/६८०
दिनांक – १४/१२/२०१०

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी</u> :

मा. प्राचार्य/मा. संचालक /मा. विभागप्रमुख
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था /पुणे विद्यापीठ पदवीव्यूत्तर विभाग
परिपत्रक महाविद्यालयाच्या/संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावून संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

**ग्रामीण भाग मार्गदर्शन**
विद्यार्थ्यांना अंगभूत क्षमतेचा विकास व गुणवत्तेचा अविष्कार करणारे प्रशिक्षण.

# महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१०/(२१५/१०)/समन्वय,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २६ नोव्हेंबर, २०१०

**प्रस्तावना** :– कला, भाषा, साहित्य, चित्रपट आणि सांस्कृतिक घटकांसाठी सादरीकरण, संशोधन आणि अनुदान याद्वारे प्रोत्साहन देण्यासाठी व यासंदर्भातील योजनांमध्ये समन्वय साधण्यासाठी स्वत:चे सांस्कृतिक धोरण असण्याची आवश्यकता अनेकवेळा व्यक्त करण्यात आली. महाराष्ट्रासारख्या विशाल, समृध्द सांस्कृतिक वारसा लाभलेल्या आणि पुरोगामी राज्याच्या शहरी संस्कृतीसारखे अत्यंत महत्वपूर्ण क्षेत्र उन्नत आणि सतत विकसनशील ठेवण्यासाठी आपल्या भावी पिढीची वाटचाल पुर्वनियोजित करण्याची आवश्यकता वाटत आहे. सांस्कृतिक धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी दिनांक ४ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सांस्कृतिक धोरणाचा मसुदा राज्य शासनास सादर केला. त्यास अनुसरून महाराष्ट्र शासनाने विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले आहेत. सांस्कृतिक क्षेत्रातील आतापर्यंतचा महाराष्ट्राच्या प्रवासाचा आढावा घेऊन भावी वाटचालींकडे नियोजन करणे, राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष औचित्यपूर्ण ठरेल हे विचारात घेऊन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने दिनांक ०१/०७/२०१० च्या शासन निर्णयान्वये सांस्कृतिक धोरण २०१० निर्गमित केले आहे. सदर धोरणातील ग्रामीण विद्यार्थी मार्गदर्शनाबाबत सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक** :– उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे ग्रामीण भागातून शहरी भागात येणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरी भागात वावरताना भेडसावणाऱ्या समस्यांची माहिती देणारे आणि त्या समस्यांवर मात करण्याविषयी तसेच त्या विद्यार्थ्यांच्या अंगभूत क्षमतेचा विकास आणि गुणवत्तेचा अविष्कार करण्याविषयी मार्गदर्शन करणारे प्रशिक्षण आवश्यक असते. तेव्हा उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व शिक्षण संचालकांनी आणि अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरू यांनी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी मार्गदर्शनपर प्रशिक्षिण आयोजित करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सर्व संचालकांनी आणि विद्यापीठांच्या कुलगुरूंनी सदर परिपत्रक त्यांच्या अखत्यारितील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी महाविद्यालय, तांत्रिक शाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या निदर्शनास आणावे आणि सदर सूचनांची काटेकोर अमंलबजावणी करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच अंमलबजावणीचा नियमित आढावा घेण्यात यावा.

सदर परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय सांकेतिक क्रमांक २०१०११२६२०५०५४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही
(दि. धो. तिवरेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

(कृ.मा.प...)